# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः 14.04.2024 वारः रविवार

------------------------------------------------------------------------

१. पंतप्रधान आज कर्नाटक दौऱ्यावर – प्रचारसभांना करणार संबोधित .
२. बेरोजगारी आणि वाढत्या महागाईसारख्या मुद्द्यांकडे पंतप्रधानांचं दुर्लक्ष - काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप
३. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन आणि
४. इराणचे इस्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले

**पंतप्रधान-कर्नाटक**

पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज एक दिवसाच्या कर्नाटक दौऱ्यावर जात आहेत. आज दुपारी म्हैसूर इथे एका जाहीर सभेला ते संबोधित करणार आहेत. तर मंगळुरू या समुद्र किनारी असलेल्या शहरात पथ प्रदर्शनाचंही आयोजन करण्यात आलं आहे. म्हैसूर इथल्या जाहीर सभेत म्हैसूर, चामराजनगर, मंड्या आणि हसन लोकसभा मतदारसंघातील पक्ष कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. संध्याकाळी मंगळुरूमध्ये श्री नारायण गुरु सर्कल ते नवभारत सर्कल मार्गावर पथ-प्रदर्शन आयोजित केलं आहे. या दोन्ही कार्यक्रमांना भाजपा आणि त्यांचा सहकारी पक्ष असलेल्या जनता दल - सेक्यूलर चे समर्थक उपस्थित राहणार आहेत.

**काँग्रेस प्रचार**

“बेरोजगारी आणि वाढत्या महागाईसारखे मुद्दे मुख्य प्रवाहातील माध्यमं बाजूला ठेवतात. पंतप्रधान नरेंद्र मोदीही अशा महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष देत नाहीत”, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील साकोली इथल्या जाहीर सभेत ते काल बोलत होते. या मतदारसंघात काँग्रेसनं डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी दिली असून भाजपकडून विद्यमान खासदार सुनील मेंढे उभे आहेत.
दरम्यान, आज भंडारा -साकोली इथे केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची मेंढे यांच्या प्रचारासाठी जाहीर सभा होणार आहे.

**काँग्रेस-यादी**

काँग्रेसनं काल लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या 16 उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. या यादीत गुजरातसाठी 4 , हिमाचल प्रदेशसाठी 2 , चंदीगडसाठी 1 आणि ओडिशासाठी 9 उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी हे चंदीगड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवतील. माजी केंद्रीय मंत्री श्रीकांत जेना ओडिशातील बालासोर मतदारसंघातून लढणार आहेत. हिमाचल प्रदेशचे मंत्री विक्रमादित्य सिंग हे मंडी मतदारसंघातून निवडणूक लढवणार असून तिथे कंगना राणौत या भाजपाच्या उमेदवार आहेत.

**संदेश खली**

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग NHRC ने आपल्या चौकशी अहवालात पश्चिम बंगालमधील संदेशखाली प्रकरणात अनेक मानवी हक्कांचं उल्लंघन झाल्याचं म्हटलं आहे. तिथल्या पीडितांवर अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या असून, अशा घटना रोखण्याच्या निष्काळजीपणामुळे मानवी हक्कांचं उल्लंघन झाल्याचं प्रथमदर्शनी दिसत असल्याचं आपल्या अहवालात स्पष्ट केलं आहे. सूडाची व्यापक भीती आणि सत्तेतील शक्तीमुळे अशा पीडित व्यक्तींना आपल्या तक्रारी मांडण्यापासून रोखलं जातं. मानवाधिकार समितीनं आपला चौकशी अहवाल पश्चिम बंगालच्या मुख्य सचिव तसंच पोलीस महासंचालकांना आठ आठवड्यांच्या आत आपल्या कारवाईचा अहवाल सादर करण्यासाठी पाठवला आहे. NHRC नं दिलेल्या शिफारशींमध्ये – कायदा आणि अधिकार्यांवरील विश्वास पुनःप्रस्थापित करणे, साक्षीदारांचं संरक्षण करणे, तक्रार-निवारण निश्चित करणे आणि केंद्रीय समितीकडून तक्रारींची निष्पक्ष तपासणी करणे - यांचा समावेश आहे.

एनएचआरसीच्या तपास पथकाला पीडितांच्या मनातून या व्यक्तींची भीती काढून टाकण्याची गरज असल्याचं लक्षात आलं. जेणेकरून पीडितांना आपल्या कुटुंबासह सामान्य जीवन जगता येईल, समाजात सन्मानानं आणि अभिमानानं जगण्याचा आत्मविश्वास मिळेल.

या वर्षी फेब्रुवारीमध्ये, पश्चिम बंगालमधल्या उत्तर 24 परगणा मधल्या संदेशखाली इथे , एका राजकीय व्यक्तीच्या स्थानिक टोळीकडून निरपराध-गरीब महिलांचा छळ करून लैंगिक अत्याचार करण्यात आले होते. या घटनेच्या माध्यमांमधील अहवालांची NHRC ने, स्वतःहून दखल घेतली.

**आंबेडकर जयंती**

भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आज त्यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त संपूर्ण राष्ट्र आदरांजली वाहत आहे. यानिमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्य कार्यक्रमात संसद भवन इथे त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

“सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यायशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाज-सुधारक आणि राजकीय नेते म्हणून देश आणि समाजासाठी अनन्यसाधारण योगदान दिलं” असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. “भारताचे महान सुपुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारच नव्हते तर ते सामाजिक न्यायाचे धुरीण होते. सामाजिक विषमता आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न अनेक पिढ्यांना प्रेरणा देत आहेत.” असं उपराष्ट्रपती यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**मुंबई-आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेने आज मुंबईतील चैत्यभूमी इथे श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं चैत्यभूमी इथलं स्मारक, राजगृह इथलं त्यांचं निवासस्थान आणि आजूबाजूच्या परिसराचं - सुशोभीकरण करण्यात आलं आहे.

**इराणइस्रायल**

वासावर केलेल्या हवाई हल्ल्याचा सूड म्हणून इस्रायलच्या दिशेने अनेक ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली आहेत.
इराणच्या प्रेस टीव्हीवरील इराणच्या एलिट रिव्होल्युशनरी गार्ड, IRGC ने दिलेल्या निवेदनानुसार - इराणने इस्रायलमधील लक्ष्यांवर व्यापक प्रमाणात ड्रोन हल्ले सुरू केले आहेत. IRGC नुसार आणखी डझनभर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांसह इस्रायलमधील विशिष्ट लक्ष्यांवर मारा केला जाणार आहे.

इस्रायल डिफेन्स फोर्सेस, आयडीएफनेही इराणी ड्रोन त्यांच्या हद्दीत आल्याची पुष्टी केली आहे. इस्रायली लष्करी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, इराणने 100 हून अधिक ड्रोन सोडले असल्याचा इस्रायलचा अंदाज आहे.
इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी तेल अवीव इथल्या लष्करी मुख्यालयात त्यांच्या युद्धकालीन मंत्रिमंडळाची बैठक बोलावली आहे . इस्रायल, जॉर्डन, लेबनॉन आणि इराकने आपली हवाई क्षेत्रे बंद केली असून सीरिया आणि जॉर्डनने हवाई सुरक्षा अधिक कडक केली आहे.

इराणने 1 एप्रिल रोजी सीरियातील आपल्या वाणिज्य दूतावासावर केलेल्या हल्ल्याचा सूड घेण्याची शपथ घेतली होती. य हल्ल्यात एका कमांडरसह सात लष्करी अधिकारी मारले गेले होते. हा हल्ला इस्रायलने केल्याचा आरोप असून इस्रायलने मात्र यावर भाष्य केलेलं नाही.

इराणच्या हल्ल्याचा निषेध करत ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी ब्रिटन इस्रायलच्या सुरक्षेसाठी उभा राहील असं म्हटलं आहे. यापूर्वी, भारत, फ्रान्स, पोलंड आणि रशिया या देशांनी आपल्या नागरिकांना या प्रदेशात प्रवास करण्यापासून सावध केलं असून गाझामधील युद्धाचा हा सातवा महिना आहे.

**इराणहल्ला२-इस्राएल**

दरम्यान, यु के चे रॉयल एअर फोर्स हवाई दल आवश्यकतेनुसार ड्रोनला रोखेल असं युनायटेड किंगडमने म्हटलं आहे . अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक या दोघांनीही इराणच्या हल्ल्याचा निषेध केला आणि इस्रायलला पाठिंबा दिला आहे .

**जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल त्यांचे यूके समकक्ष डेव्हिड कॅमेरून यांच्याशी चर्चा केली. पश्चिम आशियातील उदयोन्मुख परिस्थिती तसंच उभय देशांमधील संबंधांवर चर्चा केल्याचं समाज माध्यमातील एका पोस्टमध्ये डॉ जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**ऑस्ट्रेलिया चाकू हल्ला**

ऑस्ट्रेलियाच्या सिडनी इथल्या शॉपिंग सेंटरमध्ये चाकूहल्ला करून सहा लोकांचा जीव घेणाऱ्या इसमाची ओळख पटली आहे. जोएल काऊची असं या ४१ वर्षीय इसमाचं नाव आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला घटनास्थळीच गोळ्या घालून ठार केलं होतं. मानसिक समस्यांमुळे त्यानं एकट्यानंच हा चाकूहल्ला केल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. कोणतीही विशिष्ट विचारधारा किंवा उद्दिष्ट यामागे आढळलेलं नसल्याचा पुनरुच्चारही पोलिसांनी केला आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी या हल्ल्याचा निषेध केला. हल्लेखोराचा सामना करणाऱ्या आणि त्याला ठार करणाऱ्या महिला पोलीस अधिकाऱ्याचंही त्यांनी कौतुक केलं.

**विशेष रेल्वे**

उन्हाळी सुट्टीत मुंबईहून उत्तरेकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता मध्य रेल्वेनं २२ अतिरिक्त, उन्हाळी विशेष रेल्वे गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या पनवेल ते बिहारमधल्या छपरा दरम्यान - कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, भुसावळ, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, प्रयागराज, वाराणसी, ग्यानपूर शहर आणि बलिया या स्थानकांवर थांबतील.

**नेमबाजी**

भारताच्या पलक आणि सैन्यम यांनी रिओ दी जानेरो इथे  सुरू असलेल्या आय एसएसएफच्या ऑलिम्पिक पात्रता फेरीत काल महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकाराच्या अंतिम फेरीत धडक मारली आणि भारताचं पात्रता फेरीतलं स्थान भक्कम केलं. पहिल्या पात्रता फेरीत पलकनं आणि दुसऱ्या फेरीत सैन्यमनं ५७८ गुणांची कमाई केली आणि सहावा आणि सातवा क्रमांक पटकावला. या स्पर्धेची अंतिम फेरी आज होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.